गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष १ ले ● अंक २८६ वा ● गुरुवार ०७ मार्च २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 286 | Date : 07/03/2024 blow :Thursday Page 4 Price 4

## रोजगार देणे पुण्याचे काम : मुख्यमंत्री

ठाणे : कुटुंबातील एका व्यक्तीला रोजगार मिळाला की, संपूर्ण कुटुंबाला आधार मिळतो. म्हणूनच एखाद्याला रोजगार देणे हे पुण्याचे काम आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

येथील कोपरी येथे महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास विद्यापीठ संचालित संत गाडगे बाबा स्वच्छ भारत स्किल अकॅडमीचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.यावेळी राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा पालकमंत्री शंभूराज देसाई, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, माजी आमदार रविंद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, कौशल्य विकास आयुक्तालयाच्या आयुक्त श्रीमती निधी चौधरी, कुलगुरु अपूर्वा पालकर, बी.व्ही.जीचे मुख्य कार्यकारी अधिकारी हणमंतराव गायकवाड, नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (छडऊ) चे अजय रैना आदि मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, शासनाकडून निर्णय झाला होता की,





राज्यातील बेरोजगार युवकांना ७५ हजार शासकीय नोकऱ्या देणार, मात्र प्रत्यक्षात एक लाख ६० हजार शासकीय नोकऱ्या आतापर्यंत देण्यात आल्या आहेत. शासनाने शासकीय नोकर भरती बंदी उठविली. कौशल्य विकास विभागाने अतिशय उल्लेखनीय काम करून दाखविले असून या विभागाकडून आतापर्यंत १ लाख नोकऱ्या दिल्या गेल्या असून १ लाख स्वयंरोजगार उभे करण्यात आले आहेत.

ते पुढे म्हणाले की, गरज म्हणून नोकरी तर करायला हवी मात्र नोकऱ्या देणारे हातही घडविले पाहिजे. बीव्हीजी चे हणमंतराव गायकवाड यांनी पुढच्या दहा वर्षात दहा लाख नोकऱ्या देण्याचे नियोजन केले आहे. यासाठी आजच लोकार्पण केलेले देशातील पहिले स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास प्रबोधिनी आणि संत गाडगेबाबा स्वच्छ भारत स्किल डेव्हलपमेंट केंद्र मोलाची भूमिका बजावणार आहे. संत गाडगेबाबांनी स्वच्छतेतून समाजाच्या स्वस्थतेकडे जाण्याचा मार्ग दाखविला. हाच आदर्श समोर ठेवून या शासनाने देखील डीप क्लीन ड्राईव्हच्या माध्यमातून संपूर्ण महानगरांमध्ये स्वच्छता मोहीम सुरू केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्याला स्वच्छतेचे महत्व पटवून दिलेच आहे. त्याच पद्धतीने डीप क्लिन ड्राईव्हचे अभियान सुरु आहे.

विविध सामाजिक संस्थांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी बेरोजगारांची यादी बनवावी व ही यादी अशा संस्थांकडे द्यावी. या बेरोजगार तरुण-तरुणींना कौशल्य विकास प्रशिक्षणानंतर त्यांना तीस हजार ते दीड लाख रुपयांपर्यंत पगार मिळणार आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेच्या माध्यमातून अनेकांनी आपले स्वयंरोजगार सुरू केले. आजच्या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून देखील दहा हजार आठशे महिलांना आपण शिलाई मशीन व घरघंटी दिल्या. ही व्यवसायाची सुरुवात आहे, अशा छोट्या छोट्या व्यवसायातून तोच व्यवसाय व्यवस्थित केल्यानंतर भविष्यात ती व्यक्ती एक मोठी । **पान २ वर**

## प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पुण्यातील मेट्रो प्रकल्पांचा शुभारंभ




मुंबई : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पिंपरी - चिंचवड महानगरपालिका ते निगडी, पुणे मेट्रोचे भूमीपूजन करण्यात आले. यावेळी रुबी हॉल क्लिनिक ते रामवाडी, पुणे मेट्रोला प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी हिरवा झेंडा दाखवला. प्रधानमंत्री यांनी कोलकाता येथून विविध प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन केले. यावेळी त्यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील या मेट्रो प्रकल्पांची दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सुरुवात केली. या कार्यक्रमासाठी सह्याद्री अतिथीगृह येथून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे सहभागी झाले होते.

प्रधानमंत्री लोकार्पण करत असलेल्या पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक ते रामवाडी हा मेट्रो मार्ग सहा किलोमीटरचा असून ५ फेब्रुवारी २०२४ रोजी या मेट्रोची ट्रायल रन झाली आहे.यापूर्वी ६ मार्च २०२२ रोजी पीसीएमसी ते फुगेवाडी या सात किलोमीटर आणि वनाज ते गरवारे या पाच किलोमीटर मेट्रो मार्गाचे उद्घाटन प्रधानमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले होते. फुगेवाडी ते सिविल कोर्ट ६.९१ किमी आणि गरवारे ते रुबी क्लिनिक ४.७५ किमी अशा मेट्रोच्या टप्प्यांचे लोकार्पण प्रधानमंत्री यांच्या हस्ते १ ऑगस्ट २०२३ रोजी करण्यात आले होते आणि आज रुबी हॉल क्लिनिक ते रामवाडी या सहा किलोमीटर मार्गाचे लोकार्पण प्रधानमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रधानमंत्री यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते निगडी या पहिल्या टप्प्यातील मेट्रोचे भूमिपूजन देखील करण्यात आले.हा मार्ग ४.४ किमीचा असून पूर्णपणे उन्नत मार्ग आहे.

यामुळे स्वारगेट ते पीसीएमसी कॉरिडॉर हा निगडीपर्यंत विस्तारित होणार आहे. मागील पावणे दोन वर्षांपासून महाराष्ट्रात प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू आहेत. रेल्वे आणि मेट्रोसाठी सुद्धा राज्यासाठी मोठ्या प्रमाणावर तरतूद करण्यात आली आहे, ज्याचा फायदा नागरिकांना होत आहे.

आज लोकार्पण करण्यात आलेल्या पुण्यातील मेट्रो मार्गाचे भूमिपूजन देखील प्रधानमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले होते आणि आज त्यांच्याच हस्ते ही मेट्रो सेवा सुरू देखील झाली आहे.वाढत्या शहरीकरणामुळे स्मार्ट आणि दर्जेदार वाहतुकीची गरज आहे. मेट्रो सेवेमुळे ही गरज पूर्ण होऊन इंधन आणि वेळेत देखील मोठी बचत होणार आहे. सर्व प्रकल्प आणि विकासकामे गतीने सुरू असल्यामुळे महाराष्ट्राला मोठा फायदा होत आहे, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

## राज्यांच्या विकासानेच देशाचा विकास! पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

हैदराबाद : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी संगारेड्डीमध्ये सात हजार २०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन केले. तेलंगणच्या प्रगतीसाठी आपल्या कटिबद्धतेचा पुनरुच्चार करताना ते म्हणाले की, राज्याचा विकास हाच देशाचा विकास या भावनेने आपण काम करतो.मोदी आपल्या सरकारची कार्यप्रणाली विशद करताना म्हणाले की, ''राज्य विकासाद्वारे राष्ट्र विकासाच्या मंत्रा'वर माझा विश्र्वास आहे. आज १४० कोटी भारतीय विकसित भारताच्या ध्येयपूर्तीसाठी दृढनिश्र्चय करत आहेत.'' विकसित भारतासाठी आधुनिक पायाभूत सुविधा आवश्यक आहेत.

तेलंगणातील प्रकल्पांमध्ये रस्ते, रेल्वे, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूसारख्या प्रकल्पांचा समावेश आहे. मोदींनी हैदराबादमध्ये नागरी विमान वाहतूक संशोधन संस्थेच्या केंद्राचे उद्घाटन केले.या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी तीन राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणीही केली. राष्ट्रीय महामार्ग-६५ च्या पुणे-हैदराबाद विभागाच्या २९ किलोमीटर लांबीच्या टप्प्याच्या सहा पदरी कामाचे भूमिपूजनही त्यांनी केले.

संगारेड्डी येथील कार्यक्रमाला जाण्यापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी मंगळवारी येथील श्री उज्जयिनी महाकाली मंदिरात पूजा-प्रार्थना केली. आपण समस्त भारतीयांच्या कल्याणार्थ देवीकडे प्रार्थना केल्याचे मोदींनी यावेळी सांगितले.

## शेतकरी व दुष्काळप्रश्नी म्हेत्रेंच्या शिष्टमंडळाची जिल्हाधिकाऱ्यांशी भेट...!

### माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी विवीध प्रश्नी दिले निवेदन..

**अक्कलकोट हा दुष्काळी नव्हे तर दुष्काळसदृश तालुका...!**

मंगळवारी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्यामध्ये झालेल्या चर्चेत अक्कलकोट हा दुष्काळी नव्हे तर दुष्काळसदृश तालुका यादीत असल्याची माहिती देण्यात आली.म्हेत्रे यांनी दुष्काळी सवलतींविषयी शेतकऱ्यांना आवश्यक मदत मिळण्यासंदर्भात मागणी केली.यावर जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी तसा अहवाल पाठवुन शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.जिल्ह्यातील चारच तालुके यापूर्वी दुष्काळी जाहीर करण्यात आले आहेत.यामध्ये अक्कलकोट तालुक्याचा समावेश नाही.



अक्कलकोट/प्रतिनिधीः मागील वर्षी अत्यल्प पावसाळा झाल्यामुळे अक्कलकोट मतदारसंघात भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे.या पार्श्र्वभूमीवर विविध समस्यांविषयी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना निवेदन दिले. मंगळवारी म्हेत्रे यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेतली.यावेळी




## कंटेहळ्ळीचे ग्रामपंचायत व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने बिडीओचा सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट पंचायत समिती येथे नुकतेच रुजू झालेले प्रभारी गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ यांचा सत्कार महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व कंटीहळीचे ग्रामपंचायत सरपंच अनिल येडे व पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष कमलाकर सोनकांबळे यांच्या वतिने सत्कार करण्यात आले.यावेळी संघाचे सचिव विश्र्वनाथ चव्हाण, विस्तार अधिकारी संजय पाटील, सहायक गट विकास अधिकारी धोडमनी, ज्येष्ठ पत्रकार समाधान अहिरे, यावेळी बोलताना वाघ म्हणाले की,महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातील पदाधिकाऱ्यांचे कार्य प्रत्येक क्षेत्रात अनमोल असल्याचे सांगितले. यावेळी निंगप्पा निंबाळ पत्रकार अजित राठोड, सैदाप्पा झळकी नामदेव राठोड आदी उपस्थित होते.

## जातीचे प्रमाणपत्र वेळेत द्या अन्यथा आंदोलन करू : मडिखांबे

### रिपाई आठवले गटाच्या वतीने प्रांत अधिकारी विठ्ठल उदमले यांना निवेदन

सोलापूर/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील सर्व १० वी व १२ वी विद्यार्थ्यांचे परीक्षा चालू झालेले असून त्यांना पुढील शिक्षण घेण्यासाठी जातीच्या दाखल्याची नितांत आवश्यकता असते तसेच सर्वसाधारणपणे जातीचा दाखला मिळण्यासाठी २१ दिवसाची मर्यादा असले तरी जातीचा दाखला मिळण्यासाठी २ ते ३ महिन्याचा विलंब लागत आहे. त्यामुळे विद्यार्थीचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अक्कलकोट तहसील मधून जाणारे जातीचे दाखले सोलापूर प्रांत अधिकारी कार्यालय यांच्याकडे तातडीने पाठवीत नसल्यामुळे ते येण्यास विलंब होत आहे.

त्यामुळे प्रांत अधिकारि यांनी सदर बाबीचा गांभीर्यपूर्वक विचार करून अक्कलकोट तालुक्यातील विद्यार्थ्यांचे व सर्व सामान्य नागरिकांनाचे जातीचे दाखले तात्काळ मिळण्यास संबंधी कर्मचारीना तंबी देऊन उपाययोजना करण्यात यावी असे विनंती या निवेनाव्दारे करण्यात आली आहे. अन्यथा रिपाई आठवले गटाच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना व त्रास्त सर्व




सामान्य नागरिकांना घेऊन तीव्र आंदोलन करू याची दखल घ्यावी व त्यावेळेस निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण झाल्यास त्या सर्वस्वी आपले प्रशासन जबाबदार राहील याची नोंद घ्यावी, यावेळी. रिपाई तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे,रिपाई तालुका युवक सरचिटणीस तम्मा धसाडे. आदी उपस्थित होते

## बबलाद येथे जुन्या पाण्याच्या टाकीचे पाडकाम करीत असताना अचानक टाकी कोसळल्याने मजुराचा मृत्यू

अक्कलकोट/प्रतिनिधीः तालुक्यातील मौजे बबलाद येथे शासनाच्या पेय जल योजने अंतर्गत व गाव अंतर्गत पाईपलाईन व पाण्याच्या टाकी बांधणे काम मंजुर असून काम चालू आहे . नविन टाकी बांधकामास जागा नसल्याने २० वर्षपूर्वी बांधलेली टाकी पाडकाम करून त्या ठिकाणी नविन टाकी बांधण्यासाठी ग्रामपंचायतीने जि . प . सोलापूर यांचे कडे रितसर परवानगी घेऊन दोन दिवसापूर्वी काम चालू केले आहे . सदर पाडकाम अक्कालकोट येथील एका ठेकेदारास काम दिले होते . सदर टेकेदाराने मंगळवार रोजी सकाळी बबलाद येथे सदर जुन्या टाकीचे पाडकाम करण्यासाठी अक्कलकोट येथील पाच मजुरांना पाठविले होते . सकाळी पाडकाम करीत अगोदर दोन कॉलम कट करून दुसर्या दोन कॉलम कट करीत असताना व दोन जेसीबी सुद्धा लावलेली असताना अचानक टाकी कोसळली . त्याखाली सददाम नदाफ वय २५ रा अक्कलकोट खाली सापडल्याने जागीच मरण पावला आहे. याबाबत माहिती मिळताच अक्कालकोट दक्षिण पोलीस



ठाण्याचे पो. नि . महेश स्वामी , मुतु खेडगी,अश्पाक बळुर्गी,उपसरपंच रमेश रोडगे,सद्दाम शेख, राजकुमार लकाब शेट्टी, एजाज मुतोली, बाबु नदाफ, मल्लु पाटील, सद्दाम शेरीकर, यांनी घटनास्थळी भेट दिली .

**पाडकाम करताना ग्रामसेवक उपस्थित नव्हते . मयताला तीन तासाच्या अथक पयत्न करून गावकऱ्यांनी बाहेर काढले**

## संपादकीय

### राहुल यांनाही अपयश..

निवडणुकीच्या तारखा कधीही जाहीर होऊ शकतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपप्रणीत एनडीए हा मोठ्या ताकदीनिशी लोकसभेच्या रणांगणात उतरेल. दुसऱ्या बाजूला ईडी, सीबीआयच्या कारवाईत अडकलेले विरोधक इंडियाच्या नावाखाली एकत्र आले असले तरी, प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेस पक्षात असलेली उदासीनता पाहता मोदींच्या अश्वमेधाच्या घोड्यापुढे काँग्रेस किती काळ तग धरेल, हा आता जनतेपुढे प्रश्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेस पक्षातील नाराजीतून भाजपमध्ये प्रवेश केला. गेल्या आठ दिवसांचा आढावा घेतला तर काँग्रेसला कशी उतरती कळा लागली आहे, हे दिसून येईल. अलीकडील राज्यसभा निवडणुकीत झालेल्या क्रॉस व्होटिंगची चर्चा सुरू आहे. त्यात हिमाचल प्रदेशमधील काँग्रेसचे सरकार राहणार की जाणार, याकडे लक्ष लागले आहे. काँग्रेसचे राज्यसभेचे उमेदवार अभिषेक मनू सिंघवी यांचा भाजपच्या हर्ष महाजन यांनी पराभव केला. खरे तर हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसचा विजय स्पष्ट होता. परंतु तरीही भाजपच्या उमेदवाराला काँग्रेसच्या आमदारांनी मतदान केल्याने सिंघवी यांचे संसदेत जाण्याचे स्वप्न भंगले. राज्यसभा निवडणुकीत तीन अपक्ष आणि काँग्रेसच्या सहा आमदारांनी सरकारची साथ सोडली. क्रॉस व्होटिंगमध्ये भाजप उमेदवाराचा विजय झाला. हिमाचलमधील मंत्री विक्रमादित्य सिंह यांनी काँग्रेसवर आरोप करत मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे, तर दुसरीकडे भाजपने राज्यपालांची भेट घेऊन बहुमत चाचणीची मागणी केली आहे. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी भारत जोडो न्याय यात्रा सुरू केली, त्याच दिवशी माजी मंत्री मिलिंद देवरा यांनी काँग्रेसला राम राम केला होता. सध्या काँग्रेसमधील गळती थांबायला तयार नाही. आता लोकसभा निवडणुका समोर आहेत. परंतु ज्या काँग्रेस उमेदवारांना जनता मतदान करणार आहे ते काँग्रेसचे लोकप्रतिनिधी पुढील पाच वर्षांसाठी पक्षाशी एकनिष्ठ राहतील का?, ते दुसऱ्या पक्षात जाणार नाहीत याची आता काँग्रेसचे तिकीट देणाऱ्या नेत्यांनाही खात्री नाही. तर मग अशा लोकप्रतिनिधींना निवडून देऊन जनता आता काँग्रेसला मतदान करून चूक करणार नाही. इंडिया आघाडीच्या नावाखाली विरोधक एकत्र आले असले तरी त्याच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने मत मागताना जनतेला काय तोंड दाखविणार, असा प्रश्न काँग्रेसपुढे उभा राहिला आहे. आपल्या पक्षातील आमदार, खासदारांचे समाधान करण्यात राहुल यांनाही अपयश आल्याचे दिसून येत आहे.

# चारचाकी वाहने चोरणाऱ्या टोळीच्या आवळल्या मुसक्या

## दोन पिकअप वाहने, ट्रकमधील पाण्याची टाकी व रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त



पुरंदर/ प्रतिनिधी : सासवड येथील धुमाळ पेट्रोल पंपासमोर लावलेला पाण्याचा टँकर हा दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी रात्रीच्या वेळी चोरीस गेलेबाबत श्री. अनिल बाबुराव फडतरे रा. सुपे खुर्द ता. पुरंदर जि. पुणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सासवड पोलीस स्टेशन येथे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकामार्फत चालू असताना सीसीटीव्ही तपासण्यात आले, गुन्ह्याचे कार्यपद्धतीचा अभ्यास केला असता सदरचा गुन्हा हा रेकॉर्डवरील गुन्हेगारांनी केला असल्याचे निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ४ चाकी वाहने चोरणारे रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती घेण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान पथकाला गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की, रेकॉर्ड वरील गुन्हेगार नामे १) ओमकार हरी शेळके रा. होलेवस्ती, उंड्री ता. हवेली जि. पुणे याने त्याच्या साथीदाराच्या मदतीने सदरचा गुन्हा केला आहे. सदर बातमीचे आधारे त्यास व त्याचा साथीदार २) मेहबूब उर्फ राजू अब्दुल शेख रा. आदर्श कॉलनी, हांडेवाडी ता. हवेली जि. पुणे यांना उंड्री परिसरातून ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबुली दिली. चोरी केलेला ट्रक व पाण्याची टाकी आरोपी नामे ३) फाजील अहमद खान पठाण वय २९ रा. बाबानगर, ता. उदगीर जि. लातूर याला विक्री केला असल्याचे सांगितले त्यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून पाणी टाकी हस्तगत करण्यात आली असून त्याने गुन्ह्यातील ट्रक हा आरोपी नामे ४) अहमद चांदपाशा शेख यास विक्री केला असल्याचे सांगितले. आरोपी फाजील पठाण याचेकडून ट्रक विक्री करून मिळालेली रोख रक्कम तसेच अटक आरोपींकडून आणखीन दोन पिकअप वाहने हस्तगत करण्यात आली आहेत. सदर पिकअप वाहनांबाबत जळकोट पोलीस स्टेशन जिल्हा लातूर व लोणी काळभोर पोलीस स्टेशन पुणे शहर येथे चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे तपासात समोर आले आहे. अटक आरोपींकडून पाण्याची टाकी, रोख रक्कम व दोन पिकअप वाहने असा एकूण नऊ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. पंकज देशमुख मा पोलीस अधीक्षक सो पुणे ग्रामीण, श्री संजय जाधव मा अप्पर पोलीस अधीक्षक बारामती विभाग, श्री श्रीकांत पांडुळे मा उपविभागीय पोलीस अधिकारी भोर विभाग सासवड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अविनाश शिळीमकर, सपोनी कुलदीप संकपाळ, सपोनी योगेश लंगोटे, पोसई प्रदीप चौधरी, पोलीस अंमलदार विजय कांचन, राजू मोमीन, स्वप्नील अहिवळे, अमोल शेडगे, तुषार भोईटे, धीरज जाधव, सासवड पोलीस स्टेशनचे सपोनी बाजीराव ढेकळे, पोसई अतुल खांदरे, पोलीस अंमलदार गणेश पोटे, जब्बार सय्यद यांनी केली. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सासवड पोलीस करत आहेत. अटक आरोपींना न्यायालयाने दिनांक २ मार्च २०२४ पर्यंत पोलीस कस्टडी दिली आहे.




# वागदरीच्या उपसरपंचपदी सुरेखा भालचंद्र यादव यांची बिनविरोध निवड

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील वागदरी ग्राम पंचायतीच्या उपसरपंच पदी राजकीय चळवळीतील अनुभवी जेष्ठ कार्यकर्ते भालचंद्र गोपीनाथ यादव यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुरेखा भालचंद्र यादव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नोव्हेंबर-२०२२ मध्ये वागदरी ग्राम पंचायतीची सार्वत्रिक निवडणूक होऊन ग्रा.प.सदस्या मधून सौ.मिनाक्षी महादेव बिराजदार यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली होती. एक वर्ष त्यांनी आपला पदभार उत्कृष्टपणे सांभाळून पॅनलमध्ये ठरल्याप्रमाणे तांत्रिक आडचणीमुळे त्यांनी दोन महिन्यापुर्वी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.त्यामुळे हे पद रिक्त झाले होते. या रिक्त पदासाठी दि.४ मार्च २०२४ रोजी निवडणूक निर्णय आधिकारी यांच्या आधिपत्याखाली निवडणूक घेण्यात आली. यावेळी उपसरपंच पदासाठी सौ.सुरेखा भालचंद्र यादव यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय आधिकारी तथा तुळजापूर प.स.विस्तार अधिकारी ए.सी.कावळे ग्रामसेवक एम.एम.तांबोळी यांनी सो.सुरेखा यादव यांची वागदरी ग्राम पंचायतीच्या उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात येत आहे असे घोषित केले. त्यांच्या या सार्थ निवडी बद्दल सरपंच सौ.तेजाबाई शिवाजी मिटकर,ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्र्वर पाटील, मिनाक्षी बिराजदार, गुनाबाई बनसोडे, अंकुल वाघमारे,जेष्ठ कार्यकर्ते शिवाजी मिटकर गुरुजी,महादेव बिराजदार मदनराजे पाटील, रामचंद्र यादव,किशोर सुरवसे, भाजपा मेडिया सेलचे तालुका अध्यक्ष किशोर धुमाळ,बाळकृष्ण बिराजदार, तात्या चव्हाण, प्रमोद सोमवंशी,शिवाजी माडजे,, नामदेव यादव ज्ञानदेव यादव धरम सुरवसे गणपत सुरवसे शंकर मोठे सह ग्रामस्थानी आभिनंदन केले आहे.

# येत्या शनिवारी कवी डॉ.किरण भिंगारदेवे यांच्या निवडक कविता कविता संग्रहाचे प्रकाशन

विटा : येथील कवी डॉ.किरण भिंगारदेवे यांनी लिहिलेल्या कवितांचे संपादन प्राचार्य डॉ.राजेखान शानेदिवाण व प्रा.डॉ.शोभा चाळके यांनी 'कवी किरण भिंगारदेवे यांच्या निवडक कविता' या कविता संग्रहाचे पुनर्प्रकाशन येत्या शनिवारी दि.०९/०३/२०२४ रोजी सकाळी १० वा. आटपाडी तालुक्यातील माडगुळे येथे बामनाचा पत्रा या ठिकाणी होणार असल्याची माहिती आटपाडी तालुका साहित्य मंच अध्यक्ष व माजी प्राचार्य सुनील दबडे यांनी दिली. आटपाडी येथील कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्र-प्राचार्य डॉ.रामदास नाईकनवरे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कविता संग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यात गझलकार सुधाकर इनामदार व सिने दिग्दर्शक,पटकथा लेखक,कवी व गीतकार प्रा.डॉ.बालाजी वाघमोडे चर्चक म्हणून सहभागी होणार आहेत.प्रमुख उपस्थितीत पुस्तकाचे लेखक डॉ.किरण भिंगारदेवे,जेष्ठ लेखक कुंडलिक भिंगारदेवे, काष्ठ शिल्पकार व जेष्ठ कवी रमेश जावीर उपस्थित राहणार आहेत.तरी या संपादित कविता संग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यास कवी, लेखक, साहित्यिक, विद्यार्थी, अभ्यासक यांनी उपस्थित राहावे.असे आवाहन माजी प्राचार्य सुनील दबडे यांनी केले आहे.




पान १ वरुन

### रोजगार देणे पुण्याचे..

व्यावसायिक बनते, असे सांगून मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, महाराष्ट्र हे माझे कुटुंब आहे, मी स्वत:ला सीएम पेक्षा कॉमन मॅन समजतो. कार्यकर्ता समजतो. म्हणूनच मला सर्वसामान्यांचे दु:ख समजते. सामान्य माणसाचे हे दु:ख समजून घेवून त्यांचे प्रश्र्न सोडविण्यासाठी हे शासन सर्व प्रकारे प्रयत्नशील आहे. राज्यात पायाभूत सुविधांचे जाळे सर्वत्र तयार होत आहे. समृद्धी महामार्ग, अटल सेतू यासारखे प्रकल्प हे गेम चेंजर प्रकल्प आहेत. पायाभूत सुविधांच्या माध्यमातून राज्याचा जास्तीत जास्त विकास करण्याचे आमचे काम सुरू आहे. तीर्थक्षेत्र, गड किल्ले स्वच्छ ठेवणे, ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत अनेक तीर्थक्षेत्रांचा सर्वांगीण विकास करण्याचा या शासनाचा प्रयत्न सुरु आहे. हे सरकार सर्वसामान्यांचे आहे. समाजातील सर्व घटकांसाठी काम करणारे हे सरकार आहे

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व राज्यगीताने झाली. सूत्रसंचलन शिबानी जोशी यांनी केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (छडऊ) यांच्यामध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण व रोजगार याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थित महत्वपूर्ण करार झाला. कौशल्य विकास आणि रोजगार या विषयात उल्लेखनीय योगदान दिल्या बद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बी.व्ही.जीचे मुख्य कार्यकारी अधिकारी हणमंतराव गायकवाड, नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC) चे अजय रैना यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कुलगुरु अपूर्वा पालकर यांनी स्वच्छ भारत अभियान हे भारत सरकारचे अतिशय महत्वाकांक्षी अभियान आहे. आज वाढती कार्यक्षेत्रे, मॉल्स, रुग्णालये, औद्योगिक आस्थापना, शैक्षणिक संस्था इत्यादी सर्वांना सुविधा स्वच्छ ठेवण्यासाठी मनुष्यबळाची गरज आहे. सुविधा क्षेत्र विकसित होत असून असून या क्षेत्रात २०२४ सालात ३ लाख ५० हजार नोकऱ्या निर्माण होण्याची शक्यता आहे. २०२३ च्या तुलनेत ही वाढ १५ ते २० टक्के जास्त असेल.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाची संत गाडगे बाबा स्वच्छ भारत स्किल अकॅडमीद्वारे विविध प्रकारचे प्रमाणपत्रे आणि पदवी अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जातात. अभ्यासक्रमाची रचना उद्योगक्षेत्राच्या बदलत्या गरज लक्षात घेऊन करण्यात आली असून नोकरीसाठी आवश्यक प्रशिक्षणाचा यात समावेश आहे. येथे मॅकेनाईज्ड हाऊसकिपींग, फ्रंट ऑफिस सेवा, इमारत देखभाल आणि सुरक्षा, फलोत्पादन, संभाषण कौशल्य इत्यादी अभ्यासक्रमांचा समावेश आहे, अशी माहिती दिली.

**या अकॅडमीची वैशिष्ट्ये** * सुविधा व्यवस्थापनातील आवश्यक प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम युवक घडवण्यासाठी लघु आणि दीर्घ कालावधीचे शिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. * सुविधा क्षेत्रात कार्य करण्यासाठी आवश्यक व्यावहारिक ज्ञान देण्यावर भर. * उत्कृष्ट शिक्षण देण्यासाठी अत्याधुनिक सोयी आणि उपकरणांनी सज्ज. * भारत विकास ग्रुपचे सर्वांगीण व्यवस्थापनासाठी सहकार्य.

# जनता विद्यालय डुबेरेच्या प्राचार्यपदी दिगंबर पठारे

सिन्नर/प्रतिनिधीः डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्यपदी श्री.दिगंबर पठारे यांची नियुक्ती झाली आहे. यापूर्वी श्री. पठारे हे पाटोदा या शाळेत उपमुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. विद्यालयाचे पर्यवेक्षक रामदास वाजे यांच्या हस्ते श्री. पठारे यांचा सत्कार करण्यात आला.



सत्काराला उत्तर देतांना श्री. पठारे म्हणाले की,मी विद्यार्थी दैवत मानून कामकाज करणार आहे.विद्यार्थ्यांच्या शिस्त व गुणवत्ता याकडे लक्ष देईल . विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त अभ्यास करून यश मिळवून शाळेचे नाव उज्ज्वल करावे असे आवाहन श्री. पठारे यांनी केले. सूत्रसंचालन शालेय सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर.करपे यांनी केले. यावेळी अरुण डावरे,सोमनाथ गिरी, राजेंद्र गांगुर्डे, सुनिल ससाणे ,सोमनाथ पगार, कचेश्र्वर शिंदे, डोंगरसिंग रबडे, टी. के.बहिरम, प्रा.रामदास वारुंगसे आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.त्यांच्या नियुक्तीचे मविप्र संस्थेचे संचालक कृष्णाजी भगत,शालेय समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे,उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठलतात्या वामने,पालक - शिक्षक संघाचे उपाध्यक्ष अण्णासाहेब वारुंगसे,माता-पालक संघाचे उपाध्यक्षा अर्चना ढोली, मंजुषा पडवळ,पर्यवेक्षक रामदास वाजे यांनी केले आहे.

# तिरडी घेऊन उपोषण,बीडीओच्या मध्यस्थीने मागे

## रोहयोचा भोंगळा कारभार, मजुराचे बोगस ठसे घेऊन लाटले पैसे

अक्कलकोट/प्रतिनिधीःरोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या बोगस कामाची चौकशी करण्याबाबत दर्शनाळचे ग्रा.पं.सदस्यांनी अक्कलकोट पंचायत समिती व जिल्हाधिकारी यांना लेखी पत्र देले असता त्याच्याकडून कोणतीच हालचाली न दिसुन आल्याने आकाश माने यांनी तिरडी घेऊन अक्कलकोट पंचायत समितीच्या गेटसमोर आमरण उपोषणाला बसले होते.चौकशी करून दोषीवर कारवाई करण्याचे लेखी पत्र प्रभारी गट विकास अधिकारी बाळासाहेब वाघ यांनी दिल्याने उपोषण मागे घेण्यात आले.



रोजगार हमी योजने अंतर्गत सिमेंट काँक्रीट रस्ता करण्यात आले.मात्र त्या कामास बांधकाम विभागाचे व शासन नियमावलीचे पालन न करता कामे केले आहे.मजुरामार्फत कामे करण्याऐवजी बोगस पध्दतीने मजुरांचे ठसे घेऊन हजेरी मस्टर भरण्यात आले.ते देखील दुसऱ्या गावच्या रोजगारांकडून मस्टर भरून घेतले.अंगठे कोणी केले?बोगस बिले कोणी काढले आणि पैसे कोणी खाल्ले यांची चौकशी करण्यात यावी. दोषी?आढळणाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात करावी व कनिष्ठ अभियंता गाडेकर यांनी बोगस एम बी करण्यास नकार दिल्यामुळे त्याच्यावर करण्यात आलेल्या खोटं गुन्हा त्वरित रद्द करण्यात यावे व ग्रामसभा व मासिक सभा न घेता बोगस ठराव लिहिण्यात आले असून ठरावात खडा खोड करण्यात आले आहे व ग्रामपंचायत सदस्य ठेकेदार असेल तर त्याचे सदस्य रद्द करण्यात यावी यासह विविध कामाची चौकशी त्वरित करण्यात यावी म्हणुन ग्रा.पं सदस्य आकाश माने यांनी तिरडी घेऊन आमरण उपोषणाला बसले होते.पंधरा दिवसात चौकशी करून संबंधित रोहयो कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याचे लेखी पत्र देण्यात आले आहे.. यावेळी सहायक गट विकास अधिकारी धोडमनी, विस्तार अधिकारी संजय पाटील उपस्थित होते

चौकशी करून पंधरा दिवसाच्या आत कारवाई करणार असल्याचे प्रभारी गट विकास अधिकाऱ्यानी दिलेल्या पत्रात म्हटले आहे.म्हणुन मी उपोषण मागे घेतलेला आहे.पंधरा दिवसात योग्य ती कारवाई न केल्यास पुन्हा साखळी उपोषण करणार आहे.-**आकाश माने,ग्रा.पं.सदस्य,दर्शनाळ अक्कलकोट**

# मधमाशा पालन शेतकरी जनजागृती मेळावा ७ मार्चला

सोलापूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत मधकेंद्र योजनेअंतर्गत मधमाशा पालन शेतकरी जनजागृती मेळावा गुरुवार दिनांक ०७ मार्च २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता माळशिरस फार्मर्स प्रोडुसर कंपनी कार्यालय, तांदुळवाडी, (ता. माळशिरस) येथे आयोजित करण्यात आला असल्याचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी ध्रुवकुमार बनसोडे यांनी कळविले आहे. या शिबीरात मध केंद्र योजना मधमाशापालन, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री विश्र्वकर्मा कौशल्य सन्मान योजना आदी योजनांची माहिती देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शेतकरी, फलोत्पादका, सेंद्रीय शेती उत्पादक शेतकरी तसेच सुशिक्षीत बेरोजगार व महिला बचत गट, तरुण तरुणी, सर्व घटकातील युवक युवतींनी मेळाव्यास उपस्थित राहुन योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहनही जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी श्री. बनसोडे,यांनी केले आहे


## विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची ११ मार्चला बैठक

सोलापूर/प्रतिनिधीः पुणे विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची तिमाही बैठक सोमवार दि.११ मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयाच्या नवीन इमारतीत सभागृह क्र.१ येथे आयोजित करण्यात आली असल्याचे महसूल उपायुक्त रामचंद्र शिंदे यांनी कळविले आहे. प्रत्येक तीन महिन्यातून एकदा त्या महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक घेण्यात येते. या बैठकीत तीन महिन्यांत आलेल्या तक्रारी व त्यावर केलेल्या उपाययोजनांबाबत आढावा घेण्यात येणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## निफाड येथील श्री संगमेश्वर मंदिरात महाशिवरात्री निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन



निफाड : सालाबाद प्रमाणे याही वर्षी निफाड येथील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान महाशिवरात्र पर्वा निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे

श्रीक्षेत्र संगमेश्र्वर विकास व सेवा केंद्र ट्रस्ट निफाड व समस्त ग्रामस्थांच्या अनमोल सहकार्याने महाशिवरात्र उत्सवानिमित्त दिनांक८ मार्च २०२४रोजी सकाळी श्रींची महापूजा होणार असून ९ वाजता श्रींची कावड व भव्य मिरवणूक निघणार आहे त्यानंतर वि.दा व्यवहारे यांचे हस्ते भाविकांना फराळ वाटप करण्यात येणार आहे ,सायं. ५ वाजता निफाड नगरपंचायतच्या नगराध्यक्ष डॉ. कविता धारराव उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे आदी मान्यवरांच्या हस्ते महादुग्धाभिषेक होणार आहे, साडेपाच वाजता सुंदर असे शिवतांडव नृत्य, शिव विवाह, सोहळा होणार असून सायं. ७ वाजता महाआरती होणार आहे तसेच दिनांक ९ मार्च २०२४ रोजी सकाळी ९ वाजता वारकऱ्यांचा हरिपाठ नंतर ११ वाजता परमपूज्य गणेश गिरीजी महाराज निफाड आश्रम यांचे हस्ते महाप्रसादाचे वाटप होणार आहे ,तरी भाविक भक्तांनी महाशिवरात्र उत्सवात सहभागी होऊन दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आव्हान निफाड ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे,

## जि.प.प्राथमिक शाळा संभाजीनगर जळकोट येथे स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा संभाजीनगर येते शाळेत स्वयंशासन दिन उपक्रम घेण्यात आला.

इ.सातवी मधील विद्यार्थ्यांनी पहिली ते सहावी वर्गाला दिवसभर अध्यापनाचे कार्य केले.यावेळी मुख्याध्यापिका म्हणून कु.वैभवी विजय पिसे व उप मुख्याध्यापिका कु.प्रतीक्षा परमेश्र्वर भोगे तसेच पर्यवेक्षक म्हणून कु श्रेया प्रेमनाथ कदम यांनी काम पाहिले. सातवी मधील विद्यार्थ्यांनी सकाळी दहा वाजल्यापासून ते चार वाजेपर्यंत दैनंदिन चालणारे तास विद्यार्थ्यांनी घेतले. या एक दिवसाच्या शाळेचे वेळापत्रक तासाप्रमाणे वैभवी पिसे यांनी तयार करून शाळा एकदम शिस्तीत शांततेमध्ये परिपाठ, प्रार्थना व विषयानुसार शाळेतील सर्व वर्गाचे तास घेतले.

त्याचप्रमाणे कला, कार्यानुभव, शारीरिक शिक्षणाचे तास घेतले. सातवी मधील सहभागी छात्र शिक्षकांनी दिवसभरातील अनुभव कथन केले. व शेवट वंदे मातरम हे गीत घेऊन शाळेतील विद्यार्थ्यांना सोडण्यात आले. यामध्ये सर्व सातवीच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. शाळेचे मुख्याध्यापक



रेणुके सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी भोसले सर, अभिवंत सर, मुरमुरे सर, इटकरी सर, वनवे सर, वाकळे सर, श्रीमती रेणुके मॅडम, श्रीमती महामुनी मॅडम उपस्थित होते.

## अक्कलकोट शहर व तालुक्यातील मुस्लिम समाजाच्या वतीने नूतन तहसीलदार यांना निवेदन



**त्याचबरोबर केसरी कार्डधारक यांना कोणतीही सवलती भेटत नाहीत त्यांचीही स्थिती ही बीपीएल समानच आहे ही बाब लक्षात घेऊन केशरी कार्डधारकांना देखील हा आनंदाचा शिधा मिळावा ही विशेष विनंती. – सोहेल फरास सामाजिक कार्यकर्ता**

अक्कलकोट/प्रतिनिधीः दिवसें दिवस महागाई वाढत आहे डाळी खाद्यतेल मसाले आधी जीवनाशक वस्तू महागले आहेत. तरी गोरगरिबांना दैनंदिन रोजगारात सण साजरे करणे सोपे नाही.

मुस्लिम समाजाच्या मुख्य रमजान ईद सणाला सुद्धा महाराष्ट्र शासनातर्फे आनंदाचा शिधा पुरविण्यात यावा. मुस्लिम समाजाच सर्वात मोठा सण म्हणजे रमजान ईद ११ एप्रिल रोजी असून ह्या मुस्लिम समाजाच्या सणाला सुद्धा गोरगरीब बेरोजगार कष्टकरी व सर्व सामान्यांना मुस्लिम बांधवांना पण आनंदाचा शिधा देऊन मुस्लिम समाजाची ईद गोड करावा यासाठी अक्कलकोट शहर व तालुक्यातील मुस्लिम समाजाच्या वतीने भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम युथ फाऊंडेशन व अक्कलकोट युवक मुस्लिम च्या वतीने नूतन तहसीलदार विनायक मगर यांना निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने सर्व समाजाच्या सणानिमित्त व जयंतीनिमित्त आनंदाचा शिधा दिला आहे. गुढीपाडवा,डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती,गणेश चतुर्थी,दिवाळी, गुढीपाडवा,शिवजयंती अशा महाराष्ट्राच्या सर्व समाजाच्या मुख्य सणानिमित्त व जयंतीनिमित्त आनंदाचा शिधा वाटप करण्याचा योग्य व मोठा निर्णय घेण्यात आला असून त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने मुस्लिम बांधवांना ईद साठीही आनंदाचा शिधा या योजनेचा विस्तार करावा महाराष्ट्रातून धार्मिक सलोख्याची मोठी परंपरा आहे. महाराष्ट्र सरकारला विनंती आहे की रमजान ईद निमित्त मुस्लीम बांधवांना सुद्धा आनंदाचा शिधा पुरवण्याचा निर्णय घ्यावा. त्याचबरोबर केसरी कार्डधारक यांना कोणतीही सवलती भेटत नाहीत त्यांचीही स्थिती ही बीपीएल समानच आहे ही बाब लक्षात घेऊन केशरी कार्डधारकांना देखील हा आनंदाचा शिधा मिळावा ही विशेष विनंती.

यावेळी असलम बागवान,हुसेन बागवान, सोहेल फरास, मोहसीन मोकाशी,हुजेफ बागवान,मुबारक कोरबू,समीर शेख, महंमद शिकलगार,रशीद खिस्तके, अयाज चंदनवाले,अशपाक किस्तके,ज्योतिबा जयभाऊ पारखे,वसीम कुरेशी,मौला शेख,तोफिक मुजावर,अफजल बागवान, जबार बागवान,महिबूब शेख, मुजम्मिल अन्सारी आदि मुस्लिम बांधव उपस्थित होते.

## नव संशोधकांनी स्थानिक इतिहास जागतिक स्तरांपर्यंत पोहोचवावा : मल्लिनाथ कल्याणशेट्टी



### विद्यार्थी इतिहास परिषदेच्या राज्यस्तरीय २० वे अधिवेशनाच्या समारोप प्रसंगी प्रतिपादन

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यास सामाजिक, सांस्कृतिक तसेच ऐतिहासिक वारसा लाभला आहे. विविध धार्मिक व सांस्कृतिक सन, उत्सव, परंपरा तसेच पंढरीची वारी, नंदिकोन यात्रा सोबतच असंख्य शिलालेख, विरगळ, किल्ले, गढी, मंदिरांमुळे जिल्ह्यास वैभव प्राप्त झाले आहे म्हणून स्थानिक इतिहासावर संशोधन करून नव संशोधकांनी आपल्या परिसराचा इतिहास जागतिक स्तरांपर्यंत पोहोचवावा असे प्रतिपादन अक्कलकोट येथील महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले. सात रस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात इतिहास विभागाने आयोजित केलेल्या विद्यार्थी इतिहास परिषदेच्या राज्यस्तरीय विसाव्या अधिवेशनाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य एम. ए. शेख होते. व्यासपीठावर प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, प्रा. नामदेवराव गरड, डॉ. नभा काकडे, प्रा. एम. एम. मस्के, डॉ. मल्लिनाथ अंजुनगीकर, सचिन अणवेकर, ऋतुराज चौसाळकर, परिषदेच्या अध्यक्षा अर्चना गुडशेल्लू आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना कल्याणशेट्टी म्हणाले की, जिल्ह्यातील ग्रामीण भागात दुर्मिळ मंदिरे आहेत. त्यामुळे उत्सव व यात्रेची परंपरा आहे. त्याचेही संशोधन होणे गरजेचे आहे .प्राचार्य एम. ए. शेख म्हणाले की, विद्यार्थ्यांनी दुर्मिळ संदर्भ साधनांचा अभ्यास करून आपल्या संशोधनास गती दिले पाहिजे. दर्जेदार व समाजोपयोगी संशोधनास न्याय मिळतो याची खात्री बाळगली पाहिजे.

प्रा. नामदेवराव गरड म्हणाले की, विद्यार्थी परिषदांमधून नव संशोधकांना संशोधन करण्याची प्रेरणा मिळते. म्हणून शाळा महाविद्यालयातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना लेखन करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचे हस्ते उत्कृष्ठ शोध निबंध लेखकास सन्मान चिन्ह, प्रशस्ती पत्र व ग्रंथ देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. एम. एम. मस्के यांनी केले. सुत्रसंचलन डॉ. सोनाली गिरी यांनी तर आभार डॉ. दशरथ रसाळ यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, प्रा. संतोष मारकवाड, श्याम साळुंखे, हमीद पठाण, अशोक इंगोले, नियाज शेख, लता रोमन, योगेश पोळ यांनी प्रयत्न केले.

## नागरिकांनी पीएम सूर्य घर योजनेचा लाभ घ्यावा : डाक विभागाचे अधीक्षक चंद्रकांत भोर

पंढरपूर/प्रतिनिधीः पीएम सूर्य घर वीज योजना हि घराघरात पोहचवण्यासाठी पोस्ट खात्यास सर्वेक्षण करण्याची जबाबदारी दिली आहे. यामध्ये पोस्ट खात्याचे कर्मचारी घरोघरी जाऊन सूर्य घर योजनेचे ऑनलाईन सर्वेक्षण करीत आहेत. या योजनेचे सर्वेक्षण दि. ८ मार्च रोजी पर्यंत करण्यात येणार असून, जास्तीत-जास्त नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पंढरपूर डाक विभागाचे अधीक्षक चंद्रकांत भोर यांनी केले आहे. रुफ टाफ सोलर वीज निर्मिती संच बसवून सौर उर्जेचा वापर करून वीज निर्मिती करणे व ती वीज घरी वापरून विजेची गरज पूर्ण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये रुफ टाफ सोलर बसवणाऱ्या कुटुंबाला दोन किलोवॅट पर्यंत प्रयेक किलो किलोवॅटला ३० हजाराचे तर तीन किलोवॅट क्षमतेची यंत्रणा बसविणाऱ्या कुटुंबाला एका किलोवॅटला १८ हजार रुपयाचे तर जास्तीत जास्त ७८ हजार रुपयाचे अनुदान मिळणार आहे.

पंतप्रधान सूर्य घर वीज योजनेच्या सर्वेक्षणाची जबाबदारी पोस्ट खात्याचे पोस्टमन व ग्रामीण भागात डाक सेवक हे घरोघरी जाऊन करीत आहेत. पोस्ट खात्यामार्फत केंद्र सरकारच्या पीएम किसान, सुकन्या योजना, महिला समृद्धी योजना अशा विविध योजना घरोघरी पोहचवण्याचे यशस्वी कार्य करत आहेत. सदर योजनेच्या सर्वेक्षणाची अंतिम तारीख ०८ मार्च असून या सर्वेक्षणाच्या कामात नागरिकांनी सहयोग द्यावा अथवा नजीकच्या पोस्ट ऑफीसला भेट देऊन माहिती घ्यावी, असे आवाहन पंढरपूर डाक विभागाचे अधीक्षक चंद्रकांत भोर यांनी केले आहे.

## नागपूर येथील श्री.शिवराम बनकर व पुणे येथील श्रीमती चंद्रप्रभा लाकडे या भाविकांकडून अनुक्रमे सहा व एक लक्ष रूपयांची देणगी

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री शिवराम किसन बनकर या दानशुर भाविकाने मंदिर समितीस सहा लक्ष रूपयाची देणगी ऑनलाईन माध्यमाद्वारे दिली आहे. श्री.बनकर हे जलालखेडा ता नरखेड जि. नागपूर येथील रहिवाशी आहेत.श्री.बनकर यांनी श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरास देणगी देण्याची इच्छा मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्र्वर देशमुख (जळगांवकर) यांच्याकडे दुरध्वनीद्वारे व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांनी ऑनलाईन पध्दतीने मंदिर समितीकडे देणगी जमा केली आहे. तसेच यापूर्वी देखील ४ लक्ष व ६ लक्ष असे एकूण १० लक्ष इतकी देणगी त्यांनी मंदिर समितीला ऑनलाईन पध्दतीने दिली आहे. आतापर्यंत या भाविकांकडून १६ लक्ष इतकी देणगी प्राप्त झाली आहे.



याशिवाय, श्रीमती चंद्रप्रभा महेंद्र लाकडे या दानशुर भाविकाने स्व.डॉ.महेंद्र वामनराव लाकडे यांच्या स्मरणार्थ रूपये ०१ लाखाची देणगी धनादेशाद्वारे दिली आहे. त्याबद्दल त्यांचा मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्र्वर देशमुख (जळगांवकर) यांच्या शुभहस्ते श्रींचा फोटो, उपरणे, लाडू प्रसाद देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. श्रीमती लाकडे ह्या धानोरी, टिंगरे नगर, पुणे येथील रहिवाशी आहेत. सोबत छायाचित्र जोडले आहे.

## नळदुर्ग येथील बोरी धरणावरील पाणी प्रश्न पेटला पाणीसाठा कमी असताना चक्क पाणी चोरी

### प्रशासनाची धडाकेबाज कारवाई पाणी चोरी करणाऱ्यांचे धाबे दणाणले

### पाण्याचा काटकसरीने वापर करावा : लक्ष्मण कुंभार

नळदुर्ग/ दादासाहेब बनसोडेः मानवाच्या जीवनामध्ये पाणी हे अनमोल निसर्गाची देण आहे प्रत्येक क्षेत्रासाठी पाणी खूप महत्त्वाचा घटक असल्याने पाणी काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज ओळखून पाण्या साठी प्रत्येक मानवाने प्रबोधन करण्याची गरज आहे

परंतु नळदुर्ग येथील बोरी धरणावरती काही असंतुष्ठ नागरिक चक्क मोटार लावुन शेताला द्यायचे दिसून आल्याने संबधीत विभागाला गोपनिय माहिती मिळताच नळदुर्ग येथील मंडल अधिकारी जयंत गायकवाड तलाठी विश्र्वास वायचाळ पाटबंधारे विभागाचे कर्मचारी एन एम पवार , एम एन गायकवाड , महावितरणचे कर्मचारी महेश जाधव , व दत्तात्रय सर्जे यांनी बोरीधरणा वर जाऊन अचानक धाड घालून त्या पाणी चोरणाऱ्या नागरीकाची मोटर जप्त केली असून संबंधितावर कारवाई करण्यात आली आहे .

तुळजापूर तालुक्याला पाणी प्रश्र्न भेडसावत असताना पाण्यावर डल्ला मारणाऱ्याचे धाबे मात्र दणाणले आहेत पाणी हे एक नैसर्गिक संसाधन आहे पाणी मानवाच्या जीवनातील खुप महत्वाचा मुलभूत घटक आहे , सजीव प्राण्याचे मानवाचे अस्तित्व जीवन हे पाण्यावर अवलंबून आहे . काही असंतुष्ट माणसे पाणी जपून वापरत नसल्याने आशा मानसावर सुद्धा नगर प्रशासनाने कारवाईचा बडगा उचलला



पाहिजे पाणी काटकसरीने वापरण्याची आजच्या काळाची गरज आहे आणि प्रत्येकांची जबाबदारी सुद्धा आहे .

बोरी धरणातील पाणीसाठा केवळ ६% असून या पाण्यासाठी नागरिकांची भटकंती होऊ नये यासाठी प्रत्येक मानवाने प्रत्येक नागरिकाने पाण्याचा काटकसरीने वापर करावा , पाणी वाया घालवू नये , प्रत्येकाने आपल्या नळाला तोटी बसवून घ्यावी आणि पाण्याचा संभाळ करावा आसे प्रतिपादन नगर परिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार व मंडल अधिकारी जयंत गायकवाड यांनी व्यक्त केले आहे

यांची सर्व जबाबदारी पाठबंधारे विभागाची आसुन पण या गोष्टीकडे पाटबंधारे विभागाची डोळेझाक होत आहे .संबंधित विभागाने पाणी प्रश्र्नाकडे काना डोळा न करता असे प्रश्र्न डोळयासमोर ठेवून पाणी चोरणाऱ्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे जीवनाचा सर्वात अत्यावश्यक प्रश्र्न पाणी मानला जातो यासाठी पाण्याला खूप महत्त्व आहे आणि आजच्या काळाची गरज ही आहे

केवळ बोरिधरणामध्ये ६% पाणीसाठा असल्याने हे पाहण्यासाठी पुढील दोन-तीन महिने जाणे गरजेचे आहे तर संबंधित अधिकाऱ्याने पाटबंधारे महावितरण आणि नगरपालिका आणि महसूल प्रशासनाने या सर्व बाबी लक्षात घेऊन बोरी धरणाच्या पाण्यावरती लक्ष ठेवून पाणी कोण चोरत असेल तर पाणी चोरी करणाऱ्या शेतकऱ्यावर नागरिकावर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे .

बोरी धरणावर पकडलेले मोटर हे संबंधित पाटबंधारे विभागाच्या ताब्यात दिले असून आता पाटबंधारे विभाग या नागरिकांवर काय कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .

# दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी पुरविण्यात येणाऱ्या सुविधांची विभागीय आयुक्तांकडून तपासणी



पुणे : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्र्वभूमीवर विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी शहरातील मतदान केंद्रांना भेटी देऊन दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी पुरविण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती घेतली.

डॉ.पुलकुंडवार यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी मतदान केंद्रावरील सुविधांबाबत चर्चा केली. मतदान केंद्रांवर दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मतदान केंद्राच्या दर्शनी भागात दिशादर्शक फलक लावावेत, त्याठिकाणी सुस्थितीतील रॅम्प, व्हील चेअर, विश्रांती कक्ष, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृह, प्रथमोपचार पेटी आदी सुविधा असाव्यात. मतदान केंद्र तळमजल्यावर असावे. तसेच मतदान केंद्रांवर त्यांच्यासाठी स्वतंत्र वाहनतळ असावे. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना रांगेत न थांबवता मतदान करण्याची स्वतंत्र व्यवस्था असावी अशा सूचना डॉ. पुलकुंडवार यांनी दिल्या.

पुणे लोकसभा मतदार संघाअंतर्गत २०९-शिवाजीनगर विधानसभा मतदार संघातील भारत इंग्लिश स्कुल, सीओईपी इंजिनिअरिंग कॉलेज व विद्याभवन ज्युनिअर कॉलेज, मॉडेल कॉलनी तसेच २१४-पुणे छावणी विधानसभा मतदार संघाअंतर्गत संत गाडगेमहाराज विद्यालय, कोरेगाव पार्क, आगरकर मुलींची शाळा, सोमवार पेठ व जनता विद्यालय, ताडीवाला रोड आणि २१५-कसबा पेठ विधानसभा मतदार संघाअंतर्गत एसएनडीटी कन्याशाळा, नारायण पेठ, शेट हिरालाल सराफ हायस्कुल, बुधवार पेठ व पुणे महानगरपालिका शाळा क्रमांक ७ या ठिकाणी विभागीय आयुक्तांनी भेटी दिल्या.

यावेळी विभागीय उपायुक्त रामचंद्र शिंदे, पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त राजीव नंदकर, उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ भंडारे आदी उपस्थित होते.

# हन्नूर च्या अनंत चैतन्य प्रशालेचा चित्रकला ग्रेड परीक्षेचा निकाल १०० टक्के




अक्कलकोट/प्रतिनिधीः राज्याच्या कला संचालनालयाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या शासकीय रेखाकला ड्रॉइंग ग्रेड परीक्षा ज्याची प्रमाणपत्रे दृककलांच्या विशेष उच्च अभ्यासक्रमाकरिता प्रवेश मिळवण्यासाठी महत्वपूर्ण मानली जातात अशा एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेसाठी महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था,अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य प्रशाला,हन्नूर च्या एकुण ६१विद्यार्थ्यांना बसविण्यात आले होते. पैकी एकुण ४५ विद्यार्थी हे एलिमेंटरी परीक्षेकरिता प्रविष्ट झाले होते ज्यापैकी ५विद्यार्थी 'ए' ग्रेड ने, ५ विद्यार्थी 'बी' ग्रेड ने तर उर्वरित ३५ विद्यार्थी ' सी' ग्रेड ने उत्तीर्ण झाले. तसेच इंटरमिजिएट परीक्षेकरिता प्रशालेकडून १६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते

यातील ४ विद्यार्थी 'ए' ग्रेड ने ,५ विद्यार्थी 'बी ' ग्रेड ने तर ७ विद्यार्थी ' सी' ग्रेड ने उत्तीर्ण झाले.

या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक श्री. राजेंद्र यंदे यांचे मार्गदर्शन लाभले.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक श्री.राजेंद्र यंदे यांचे संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मा. श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी,प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारवड मा. श्री. सिध्देश्र्वर कल्याणशेट्टी,संस्थेच्या संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी,मुख्याध्यापक श्री. विलास बिराजदार,पर्यवेक्षक श्री. अशोक साखरे यांनी विशेष अभिनंदन केले.

# स्वेरीच्या सिव्हिल इंजिनिअरींग विभागात 'स्ट्रक्चर रिपेअर व मेटेंनन्स' या विषयावर कार्यशाळा संपन्न



पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या सिव्हील इंजिनिअरिंग या विभागात दि. २८ फेब्रुवारी व दि.२९ फेब्रुवारी, २०२४ या दोन दिवशी 'स्ट्रक्चर रिपेअर व मेटेंनन्स' या विषयावरील कार्यशाळा संपन्न झाली. या दोन दिवसीय कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत स्वेरीसह अन्य महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व शैक्षणिक अधिष्ठाता व सिव्हील इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.प्रशांत पवार यांच्या नेतृत्वाखाली ही कार्यशाळा संपन्न झाली. यामध्ये न्यू सातारा, एस.व्ही.आय.टी,एस.व्ही, एस. एम.डी. अक्कलकोट महाविद्यालय, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग(पॉलि.) यांच्यासह इतर महाविद्यालयतील जवळपास १५० हून अधिक विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. या प्रसंगी स्वेरी संचलित इंजिनिअरींग (पॉलिटेक्निक)चे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ यांनी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. अविनाश कोकरे, प्रा. मंगेश सुरवसे, प्रा. पृथ्वीराज गुंड, प्रा. प्रशांत भागानगरे, प्रा. चैताली अभंगराव, प्रा. प्रवीण केळकर, प्रा. गिरीश फलमारी यांनी डिजीटल रीबाऊंड हॅमर, अल्ट्रासोनिक पल्स व्हेलॉसिटी, हाफसेल पोटेन्शिअल मीटर टेस्ट, कव्हर मीटर (रीबार लोकेटर) काँक्रीट कोअर कटर या मशीन्सची तांत्रिक प्रात्यक्षिकाद्वारे माहिती दिली. यावेळी प्रा. सी.आर.लिमकर यांनी 'स्टक्चरल ऑडीट व नॉन डिस्ट्रक्टीव्ह टेस्टींग' यावर सखोल मार्गदर्शन केले. पुढे त्यांनी स्ट्रक्चरल ऑडिट नॉन डीस्ट्रक्टिव पद्धतीने करण्याबद्दलही माहिती दिली.

# महाशिवरात्रीनिमित्त वटवृक्ष मंदिरातील दिनक्रमात बदल

## वटवृक्ष मंदिरात रात्री १० ते १२ या वेळेत लघुरुद्र व महाआरती



अक्कलकोट/प्रतिनिधी : सालाबादाप्रमाणे यंदाही येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात शुक्रवार दिनांक ८ मार्च २०२४ माघ वद्य त्रयोदशी रोजी महाशिवरात्री संपन्न होत आहे. या दिवशी सकाळी ७:३० वाजता भाविकांच्या वतीने स्वामींना होणारे मंदिरातील अभिषेक होतील. या दिवशी भाविकांची स्वामी दर्शनाकरिता गर्दी झाल्यास महाशिवरात्री रोजी भाविकांना टप्प्याटप्प्याने दर्शनास सोडण्यात येईल. तरी भाविकांनी मंदिरात आल्यानंतर सुरक्षितपणे दर्शन घेऊन माघारी जावे असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन / नगरसेवक महेश इंगळे यांनी केले आहे.

महाशिवरात्रीनिमित्त मंदिरातील दिनचर्येत व स्वामींच्या नित्योपचारात पारंपारीक पध्दतीचे बदल करण्यात आले आहेत. सालाबाद प्रमाणे सकाळी ११:३० वाजता नित्यनेमाने होणारी नैवेद्य आरती व रात्री ७:४५ ते ८:४५ या वेळेत होणारी शेजारती महाशिवरात्रीमुळे होणार नाही. रात्री १० वाजता पुरोहीत मोहनराव पुजारी-मंदार महाराज पुजारी व ब्रह्मरुंदांच्या विधीवत मंत्रोच्चारात रुद्राभिषेक व रात्री बारा वाजता महाशिवरात्रीची महापूजा होऊन रात्री १२ वाजता श्रींची महाआरती होईल याची सर्व स्वामी भक्तांनी नोंद घ्यावी अशी माहिती महेश इंगळे यांनी याप्रसंगी दिली.

# धार्मिक अल्पसंख्याक बहुल शाळांना पायाभूत सुविधांसाठी अनुदान ; अर्ज करण्याची मुदत १२ मार्चपर्यंत

सोलापूर/प्रतिनिधीः धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे बहुल असलेल्या जिल्ह्यातील शासनमान्य शैक्षणिक संस्थांना पायाभूत सोयी- सुविधा उपलब्ध करुण देण्यासाठी तसेच शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचावण्यासाठी शासनमान्य शाळांना अनुदानासाठी पात्र असलेल्या संस्थानी १२ मार्चपर्यंत अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी केले आहे. जिल्ह्यातील अल्पसंख्याक बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित, विना अनुदानित,कायम विना अनुदानित शाळा, अपंग शाळा, नगरपालिका, नगरपरिषद शाळा व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्याकडून विहित नमुन्यात प्रस्ताव १२ मार्च २०२४ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे सादर करण्याचे आवाहनही जिल्हा नियोजन अधिकारी श्री. पवार यांनी केले आहे.

# शिक्षणशास्त्र आणि विस्तारविभागात खाद्यमहोत्सव उत्साहात साजरा



पुणेः सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षण शास्त्र आणि विस्तार विभागामध्ये आज दिनांक ५ मार्च रोजी विभागातील विद्यार्थ्याकडून साजरा करण्यात आलेल्या खाद्य महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांनी विविध पाककृती सादर करत भरघोस प्रतिसाद दिला. यावेळी शिक्षण शास्त्र आणि विस्तार विभागातील विध्यार्थी प्रिय विभागप्रमुख डॉ. गीता शिंदे तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह शिक्षण शास्त्र विभागात चेलळश्रळीं एुलहरपसश झीसीराश साठी आलेल्या परदेशी पाहुण्यांनी देखील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेतला. यावेळी काही प्रमुख पाहुणे देखील उपस्थित होते. यानंतर कलागुणांना वाव मिळण्यासाठी सादर करण्यात आलेल्या विविध वेशभूषा कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला. विनोदी तसेच पारंपारिक वेशभूषा सादर करून विद्यार्थ्यांनी सर्वांचे मनोरंजन केले. अतिशय उस्फूर्त आणि खेळीमेळीच्या वातावरणामध्ये आजच्या विविध गुणगौरवाची सांगता झाली.



# अहमदनगर येथील डॉ.पुंड या दानशूर भाविकांकडून अन्नछत्रासाठी तीन लाख रुपयाची देणगी

पंढरपूर/प्रतिनिधी : डॉ.संजय सखाराम पुंड, डॉ. सुश्रुत संजय पुंड व डॉ. अश्र्विन संजय पुंड या अहमदनगर येथील दानशूर भाविका मार्फत मंदिर समितीच्या अन्नछत्रासाठी रक्कम रुपये तीन लाखाची देणगी प्राप्त झाली आहे. त्याबद्दल त्यांचा मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री बालाजी पुदलवाड यांच्या शुभहस्ते श्रींचा फोटो, उपरणे, दैनंदिनी, लाडू प्रसाद देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

मंदिर समितीच्या वतीने श्री संत तुकाराम भवन येथे भाविकांसाठी मोफत अन्नछत्र उपलब्ध आहे. या अन्नछत्रांमध्ये दुपारी १२.०० ते २.०० व रात्री ७.०० ते ९.०० या वेळेत मोफत पोट भरून भोजन प्रसाद उपलब्ध करून देण्यात येतो. त्यासाठी इच्छुक भाविकांना रक्कम रुपये सात हजार व त्यापेक्षा जास्त रक्कम जमा करून इच्छित दिवशी आपल्या नावे अन्नछत्रात अन्नदान करता येते. या योजनेच्या माध्यमातून डॉ. पुंड यांनी तीन लाखाची देणगी जमा करून दिनांक ६ मार्च, २०२४ रोजी अन्नछत्रात अन्नदान केले. सोबत छायाचित्र जोडले आहे.

# करून गेलो गाव नाटकाच्या माध्यमातून भाऊ कदम निफाड करांच्या भेटीला

निफाड : निफाड परिसराचे आराध्य दैवत श्री खंडेराव महाराज यात्रा उत्सव सालाबाद प्रमाणे याही वर्षी सर्व जाती धर्माच्या बांधवांनी एकतेचे दर्शन घडवत भंडाऱ्याची उधळण करत येळकोट येळकोट जय मल्हार ...म्हणत आनंद लुटला असून भरगच्च कार्यक्रम संपन्न होऊन यात्रेची सांगता करण्यात आली.या.यात्रेचा एक भाग म्हणून. दिनांक ७ मार्च २०२४ रोजी सायं.७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे चला हवा येऊ द्या फेम प्रसिद्ध कलाकार भाऊ कदम हे करून गेलो गाव या नाटकाच्या माध्यमातून निफाड करांच्या भेटीला येणार आहे...




प्रसिद्ध विनोदी कलाकार भाऊ कदम, ओकार भोजने, यांचे प्रमुख उपस्थितीत करून गेलो गाव या नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये उषा साटम, नुपूर दुलवडकर, प्रणव जोशी ,अनुष्का बोराडे, सौरभ गुंजले, सचिन शिंदे ,सुमित सावंत, दीपक लांजेकर तसेच इतर कलाकार या नाटकात असणार आहे यात्रोत्सवानिमित्ताने निफाड करांसाठी ही आनंदाची पर्वणी असून सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन निफाड नगरपंचायत च्या नगराध्यक्ष डॉक्टर कविता धारराव उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे मुख्याधिकारी अमोल चौधरी, यात्रा कमिटी मार्गदर्शक राजाभाऊ शेलार नंदू भाऊ शेलार , रथाचा लिलाव घेणारे मानकरी यात्रा कमिटी अध्यक्ष माजी, नगरसेवक देवदत्त कापसे, कार्याध्यक्ष नगरसेवक सागर कुंदे, नगरसेवक किरण कापसे,डॉ नितीन धारराव ,भास्कर ढेपले, दीपक कुंदे ,श्यामभाऊ गोळे. उपाध्यक्ष रतन गाजरे, खजिनदार महेश जंगम, सेक्रेटरी सुभाष कर्डिले, सचिव ह भ प राजेंद्र महाराज थोरात, सहसचिव विपुल सेंद्रे . नगरसेवक साहेबराव बर्डे, किशोर ढेपले,. निफाड नगर पंचायत चे पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, यात्रा कमिटी सदस्य व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे

# ब्राह्मण समाजाचे नेते बाजीराव धर्माधिकारी यांच्यावरचा खोटा गुन्हा मागे घेण्याची मागणी




नळदुर्ग/ दादासाहेब बनसोडे : ब्राम्हण समाजाचे नेते बाजीराव धर्माधिकारी यांच्या वरचा खोटा गुन्हा मागे घेण्यासाठी नळदुर्ग ब्राह्मण समाजाचे निवेदन

परळी येथे झालेल्या ब्राह्मण एकता परिषदेचे आयोजक व स्वागतअध्यक्ष, ब्राह्मण समाजाचे नेते बाजीराव धर्माधिकारी यांच्यावर सूडबुद्धीने खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे

या खोट्या गुन्हाने बाजीराव धर्माधिकारी यांना मुद्दाम गोवण्यात आले आहे या बाबत आज नळदुर्ग ता तुळजापूर येथील सर्व ब्राह्मण समाजाच्या वतीने नळदुर्ग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक स्वप्नील लोखंडे यांना या मागणीचे निवेदन देण्यात आले आहे .

यावेळी नळदुर्ग ब्राह्मण समाजाचे अध्यक्ष विनायक अहंकारी यांनी याबाबत सविस्तर म्हणणे मांडले या निवेदनावर नळदुर्ग ब्राह्मण समाजाचे अध्यक्ष विनायक अहंकारी ब्राह्मण समाज संघटनेचे सचिव मुकुंद नाईक ब्राह्मण समाजाचे उपाध्यक्ष प्रदीप ग्रामोपाध्याय श्री उत्तम रामदासी दीनदयाळ कुलकर्णी सुहास पुराणिक उमेश नाईक सचिन भूमकर प्रमोद कुलकर्णी..आकाश कुलकर्णी राजकुमार वैद्य संदीप वैद्य , अजय देशपांडे , अजित भूमकर.. ज्ञानेश्र्वर केसकर , शिवराज भूमकर ,सौरभ कुलकर्णी सुयेश पुराणिक सौरभ रामदासी यांच्यासह ब्राह्मण समाज उपस्थित होता .

# घरपट्टी पाणीपट्टी थकबाकीदार यांचे वर निफाड नगर पंचायत ची कडक कारवाई

## थकबाकीदारांच्या घरा समोर ढोल वाजवत दिली जाणीव करून



निफाड : निफाड नगरपंचायती मार्फत शहरातील घरपट्टी पाणीपट्टी थकबाकीदार यांचेवर कडक कारवाई करत शहरातील तीन नळ कनेक्शन कट करण्यात आले असून थकबाकीदारांच्या घरापुढे ढोल वाजवून त्यांना थकबाकी असल्याची जाणीव करून देण्यात आली आहे.

तसेच निफाड नगर पंचायतीच्या वतीने शहर वासियांना जाहीर आव्हान करण्यात येते की लवकरात लवकर नगरपंचायातीकडील घरपट्टी, पाणीपट्टी व इतर थकीत करांचा तात्काळ भरणा करून नगर पंचायतीस सहकार्य करावे अन्यथा त्यांचे नळ कनेक्शन खंडित करण्यात येऊन पुढे मालमत्ता देखील जप्त केल्या जातील. सदर कारवाई मुख्याधिकारी अमोल चौधरी व गुलाबराव नवले कर अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली शरद बोडके, कर प्रशासकीय अधिकारी,शरद काकुळते, अनिल कुंदे, नरेश धारराव, जालिंदर पवार व इतर नगरपंचायत कर्मचारी यांनी यशस्वी पार पाडलेली असून असा हा नित्यक्रम शहरातील विविध भागात सुरू राहणार आहे.